The book has many illustrations of wrong diagnosis, wrong treatment, sometimes relief due to placebo effect which is temporary instead of correct identification of TMS problem. A young basket ball player in his twenties had some mild back pain while he was brushing teeth. Hence he went to a specialist. X-ray showed a malalignment of lower end of the spine. This resulted into turning mild symptoms getting worse. Therefore, a CT scan was done that showed a herniated disc. He was devastated. Thanks to the structural imbalance diagnosis, he was profoundly depressed. It was, however, a TMS case and John Sarno's treatment gave him back normal life including playing basket ball. This illustrates the effect of mind which caused mild problem turning into a grave problem and ultimately getting resolved when the cause of TMS was identified.

"It is perfectly acceptable to have a physical problem in our culture, but people tend to shy away from anything that has to do with the emotions. It is one more reason why mind will choose a physical rather than an emotional manifestation when confronted with unpleasant emotional phenomena". This is because "there are important components of our personality that we are unaware of, that are in the unconscious (i.e. subconscious mind), that may have a profound effect on our lives. It is subconscious mind which drives persons to respond in a manner they do and they are unaware of this response.

Many patients have written to Dr. John Sarno of the relief and cure they got by reading his book. Some of them read it many times to internalize the TMS concept and to get rid of their back pain. Some letters have been reproduced in part or full in the last chapter of the book.

One of the letters is from a clinical psychologist who had active athletic life style. His pain was diagnosed as a herniated L-5 disc with sciatic nerve pain. CT scan findings and chemical symptoms resulted into this diagnose by two well-respected orthopedists. He was ordered to remain in bed for several weeks. As his incapacitation dragged on, he was worried about need of a surgery the outcome of which was uncertain. The book offered to him an alternate scientifically plausible explanation of the cause of the problem. The expert diagnosis was incorrect. On the advice of a friend who had also been cured by the book, this patient also read the book. Since he was convinced that the problem was TMS and not structural abnormality, he increased his activity against the orthopedists' medical advice. Within two weeks, he had his life back as stated in the letter. He wrote "that his letter can be of use to others who are suffering from what for me was an iatrogenic disorder caused by my orthopedists' misunderstanding of what began as a harmless somatization problem……"

**Subconscious Mind**

We have only one mind but it has double nature or two functions – conscious mind and subconscious mind. If conscious mind sows thought of peace, happiness, right action, goodwill and prosperity and when the thoughts deposited in subconscious mind are constructively harmonious and peaceful, the magic working power of your subconscious will respond.

Dr. Joseph Murphy says in his book 'The Power of Your Subconscious Mind', that once you learn the truth about the interaction of conscious and subconscious minds, you will be able to transform your whole life. "To remove discord, confusion, lack and limitation from your life, you must remove the cause. That cause is the way you use your conscious mind, the thoughts and images you encourage

in it. Change the cause and you change the effect.

He further states that subconscious mind is all wise. It knows the answer to all questions. However, it does not know it knows. It does not argue or talk with you. When you set up obstacles, delays in your conscious mind, you are denying wisdom and intelligence resident in it. Joseph Murphy recommends the following affirmation several times a day to realize desires:-

"The infinite intelligence that gave me this desire lends, guides, and reveals to me the perfect plan for the unfolding of my desire……………".

Paramahansa Yogananda's booklet 'Metaphysical Meditations' contains universal prayers, affirmations and visualizations. The affirmations can be used after prayers, meditation, while going to sleep and on waking up to sow seeds in the subconscious mind for deriving benefits of the power of the subconscious mind. Two illustrative affirmations are given below:-

i) O Eternal Energy, awaken in me conscious will, conscious vitality, conscious health and conscious realization.

ii) There is hidden strength within me to overcome all obstacles and temptations. I will bring forth indomitable power and energy

Joseph Murphy has stated in his book, the cases of healing of a malignancy of skin and restoration of optic nerves by the power of subconscious mind. He has also narrated cases of prayer healings. In one case his own sister in the UK was healed by his prayers in the US. How scientists used the subconscious mind has been illustrated by naming the scientists and their inventions. It is interesting to know that the power of subconscious mind can achieve material benefits, happiness and success. The spiritual principle that a man is the maker of his own destiny is amply illustrated by establishing what the power of subconscious mind has done.

**Conclusion**

The mind power is incredible in developing immune system. But, for majority of people there is scope to improve the power of subconscious mind. How we perceive things and what are our responses is very important. Developing healthy mind enables us to see people and respond to situations differently. We have no control over the behaviour of others. But, we have a choice of giving response which when appropriate saves us from many undesirable situations.

Positive thinking free from envy, jealousy and anger and developing subconscious mind by sowing good seeds through right affirmations will result into healthy, happy and prosperous life.

**- S.V. Naik, Mumbai-69**
Tel.No: (22) 28360249
Mobile: 9821127616

**मै हूं ना !**

पेशंट - या दुखण्याने मी अगदी हैराण झालोय डॉक्टर ! कधी कधी वाटतं आत्महत्या करावी.

डॉक्टर- आता तुम्ही माझ्याकडे आला आहात ना ? ते सगळं आता माझ्यावर सोपवा. मै हूं ना !'

**- पी.के.देवधर, पुणे**

**अनुभव**

नोकर - बाई पुढल्या एक तारखेपासून मी आपलं काम सोडणारय. मला वेड्यांच्या इस्पितळात मोठ्या पगाराची नोकरी मिळालीय.

बाई - अरे, पण तिथल्या कामाचा तुला काय अनुभव आहे ?

नोकर - व्वा बाई असं कसं ? तुमच्याकडे चांगली सहा वर्षे नोकरी केली की मी !

**- पी.के.देवधर,**

## मी पाहिलेला चीन

*(सेवानिवृत्त झाल्यावर वेळ कसा घालवावा याची भ्रांत अनेक सभासदांना सदैव पडते. बोटावर मोजण्या इतक्याच व्यक्ती कोणत्यातरी सामाजिक धार्मिक कार्यात अथवा छंदामध्ये स्वत:ला गुंतवून घेतात. आपले एक ज्येष्ठ सभासद श्री.मेघ:श्याम सदाशिव साठे हे असेच एक असामान्य व्यक्तिमत्त्व आहे. सेवानिवृत्त झाल्यापासून ते आपल्या सर्व वार्षिक सर्वसाधारण सभांना हजेरी लावतच असतात.*

*श्री.साठे ह्यांनी वयाच्या ८७ व्या वर्षी चीनचा तीन आठवड्याचा प्रवास एकट्यानेच केला. हे चीनच्या भिंतीइतकेच आश्चर्यकारक आहे. श्री साठे यांचा हा आगळावेगळा पर्यटनाचा धाडसी छंद वा उपक्रम विशेष अभिनंदनीय आहे. प्रवासातील त्यांची विविध निरीक्षणे अभ्यासपूर्ण आहेत. त्यांचे संक्षिप्त दर्शन - संपादक )*

चीनने आर्थिक, औद्योगिक व सामाजिक क्षेत्रात जी लक्षणीय प्रगती केली ती अभ्यासू दृष्टीने पाहण्याचा माझ्या प्रवासाचा मुख्य उद्देश होता. प्रेक्षणीय स्थळे सर्वच लोक बघतात. पण त्याही पलिकडे दृष्टिक्षेप टाकणे महत्त्वाचे असते. प्रथम मी चीनचे नकाशे, अनेक पुस्तके वाचून चीनचा व्हिसा मिळवला. चीनमधील बारा मुख्य गावे पाहिली. प्रेक्षणीय स्थळे न पाहता तेथील सर्व पुरुषांची वेशभूषा, शेती व्यवसाय, नियमबद्ध वाहतूक, चीनमधील शाकाहारी भोजन, भाषा, संस्कृती, लिपी याचा आनंद लुटला. चीनमधील वेशभूषा पाश्चात्य पद्धतीसारखीच आहे. शेतकरी बदके, मेंढ्या ह्यांचा जोडधंदा करतात. सामान्य लोक पाईप, तंबाखू, सिगारेट, दारु पितानाही आढळले. चीनमधील वाहने जपान जर्मनीतून आयात होत असून विजेवर चालणाऱ्या मोपेड आहेत. सर्व वाहतूक नियमबद्ध असते. तेथील लोकांचे शाकाहारी भोजनाचे पदार्थ बहुतेक भारतातील पदार्थांसारखेच आहेत. चहा, कॉफी मात्र गोल सिलेंडरमध्ये उकळते पाणी घालून चहा, कॉफीची भुकटी घालतात व ते पेय घोट घोट पितात. सर्व भाज्या, दूध सर्वत्र मिळते परंतु भारतापेक्षा महाग आहेत. स्त्रिया घरात बाहेर सर्व प्रकारची कामे करतात. हॉटेल दुकानातून पन्नास टक्के स्त्रियाच काम करताना दिसतात. रेल्वे स्टेशन स्वच्छ व एकूण वाहतूक शिस्तबद्ध आहे.

सर्वत्र चिनी भाषाच बोलली जाते. इंग्रजी भाषा तशी कमीच आहे. चिनी लिपी, चित्र लिपी प्रमाणे आहे. चित्र वरुन खाली किंवा उजवीकडून डावीकडे लिहतात. मुस्लिम वस्तीत मशिदी दिसल्या नाहीत. बुद्ध मंदिरे खूप ठिकाणी आहेत. येथे बऱ्याच वंशाचे लोक दिसतात. फक्त दहात दोन नकटे, गोरे, पीतवर्णीय दिसले. बाकी सर्व भारतीयांसारखे सावळे आहेत.

एकूण चीन भव्य दिव्य आहे. सर्वत्र शिस्त आहे. चीनच्या प्रगतीकडे पाहताना भारत किमान पंचवीस वर्षे मागे आहे.

- मेघ:श्याम सदाशिव साठे

## स्वरयात्रा

आज स्मृतींची स्वरयात्रा ही कंठातून निघाली
पुकारीत ते क्षण हर्षाचे सनई निनादली ।।धृ.।।
सजली गात्रे सजले मन हे विचार माझे सजले
तृप्तीच्या हुंकारानी हे चैतन्य जगी भरले
उन्मादाची आतषबाजी बघून दृष्टी निवली.....
आर्त स्वरांतील छोट्या ठिणग्या दु:खाच्या विझल्या
सोहळ्यात या आनंदाच्या सहभागी झाल्या
त्या क्षणताऱ्यांची ही माला स्वरांस अर्पियली....
व्याकुळले मन फुलविताना सर्व रागिण्या राग
निद्रिस्त अशा सर्व स्मृतींना आज येतसे जाग
पंचमात हर्षाच्या विरही आसावरी गुंतली....

**- सौ.उज्ज्वल र. ब्रम्हांडकर**
हिंदु कॉलनी, दादर- मुंबई १४.

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स, इकॉनॉमी सहली

**राजगुरु टुर्स**
जिव्हाळा जपणारी माणसं

| | |
|---|---|
| काश्मिर-वैष्णोदेवी (AC Bus) | 13,475/- |
| डलहौसी-धर्मशाला-अमृतसर | 9,975/- |
| सिमला-मनाली-चंदीगड (AC Bus) | 10,775/- |
| नैनीताल-कौसानी-कार्बेट | 9,975/- |
| लेह लडाख | 12,975/- |
| भूतान-पारो-थिंपू | 10,775/- |
| दार्जिलींग-सिक्कीम-कॅलींम्पॉग | 11,475/- |
| नेपाळ-पोखरा-काटमांडू | 9,975/- |
| मॉरीशस | 45,975/- |
| बॅंकॉक-सिंगापूर-मलेशिया | 55,975/- |

स्टेट बॅंक पेन्शनर्ससाठी विशेष सवलत
काश्मिर ते कन्याकुमारी बजेट हॉटेल बुकींग

संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
मुंबई : 022 - 2431 8082 / 2438 1026
पुणे : 98229 49289

## ○ कर्दळीवन - एक अविस्मरणीय आध्यात्मिक क्षेत्र

कर्दळीवन हे नरसिंह सरस्वती यांचे एक अक्षय निवास स्थान असून तिथे महाराजांची एक नैसर्गिक गुहा आहे. ह्यात साधारण १००० साधक बसू शकतात. नरसिंह सरस्वती हे दत्तात्रेयाच्या अवतारांपैकी एक आहेत.

'कर्दळी' ह्या कानडी शब्दाचा अर्थ दलदल असून हे एक निर्जन वन आहे. सात डोंगर चढणे व उतरणे, पायऱ्या पायवाटाही नाहीत, वाटेत घनदाट जंगल. येथे हिंस्र श्वापदाशिवाय मनुष्यवस्ती नाही. तीन दिवस पायी प्रवास, मुक्कामात चहा, पाणी, जेवण मिळणार नाही, तर आजारी पडल्यास डॉक्टर कोठून असणार ?

प्रवास अत्यंत खडतर असून केवळ गुरु महाराजांची कृपा म्हणूनच आमच्या ४० गुरुबंधूंनी हे आध्यात्मिक ठिकाण पाहण्याचे निश्चित केले. दत्रात्रेयाचा श्रीपाद श्रीवल्लभ हा पहिला अवतार असून दुसरा अवतार नरसिंह सरस्वती महाराज ह्यांचा आहे. ह्या श्रीपाद श्रीवल्लभ ह्यांचे चरित्र त्यांच्या ३३ व्या पिढीने तेलगूत प्रसिद्ध केले असून त्यांचे भाषांतर भाऊ महाराज निटुरकर ह्यांनी नुकतेच प्रसिद्ध केलेले आहे. हा प्रवास त्यांनी मागे दोन वेळा केला होता. हे भाऊ महाराज निटुरकर आमच्या बरोबर होते. त्यांच्यामुळे सर्व प्रवास व्यवस्थित झाला.

आम्ही सर्व गुरुबंधु २४ फेब्रु. २००८ रोजी मुंबई-हैद्राबाद एक्सप्रेसने निघून हैद्राबादला सकाळी ६ वाजता पोहोचलो. त्यानंतर बसने श्रीशैल्य मल्लीकार्जुन येथे प्रयाण केले. श्रीशैल्य मल्लीकार्जुन हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. येथे दर्शन घेतल्यावर कर्दळी वनाकडे जाण्यास निघालो. श्रीशैल्य पर्वतावरुन कृष्णा नदीकडे जाण्यासाठी रोप-वे आहे. दुर्दैवाने तो बंद असल्याने आम्हाला ६०० पायऱ्या उतराव्या लागल्या. ह्यानंतर कृष्णानदीतून आमचा नौकानयन प्रवास सुरू झाला. आजूबाजूचे सृष्टिसौंदर्य न्याहाळत आम्ही व्यंकटेश पर्वतापाशी पोहोचलो. विश्रांती घेवून व्यंकटेश पर्वत चढण्यास सुरूवात केली. डोंगरामागून डोंगर चढणे व उतरणे सुरू होते. मधूनच गुडघे बोलायचे, पण त्यांना चूप करून पुन्हा पुढचा डोंगर चढण्यास सुरूवात करायची. डोंगर चढण्यासाठी पायवाटसुद्धा नाही. हे सर्व सात डोंगर चढत उतरत आम्ही श्री.नरसिंह सरस्वती ह्यांच्या सुंदर नैसर्गिक गुहेपाशी आलो. गुरुमहाराजांच्या कृपने कोठेही हिंस्र श्वापदे दिसली नाही. वाघ, हत्ती, अस्वले व इतर रानटी जनावरे आहेत असे कळले होते. महाराजांची गुहा मोठी असून आत नरसिंह सरस्वतींची अप्रतिम मूर्ती आहे. दर्शनाने इच्छापूर्तीचे सार्थक झाले. महाराजांच्या गुहेपाशी थंडगार पाणी प्याल्यावर सर्व शीण नाहीसा झाला. एरवी १००-२०० पायऱ्या चढल्यावर माझी दमछाक होते. हे सात डोंगर चढणे व उतरणे हा माझ्या दृष्टीने एक चमत्कारच होता. परंतु तुमची आंतरिक तळमळ असेल तर गुरुमहाराज तुम्हाला तारून नेतात ह्याचा प्रत्यय आला. आमच्या बरोबर २२ ते ८१ वर्षापर्यंत वयाचे साधकांनी हाच अनुभव घेतला. या गुहेत एक साधू गेली दोन वर्षापासून तपश्चर्या करीत आहे. तो तेथील सुवर्णपुष्पे खाऊन राहतो. त्या पुष्पाने सात दिवस भूक लागत नाही.

रात्रीचा मुक्काम आटोपल्यावर दुसऱ्या दिवशी अक्कलकोट स्वामी महाराजांनी जेथे तपश्चर्या केली त्या गुहेपाशी जाण्यास निघालो. गुहेत राहणारा एक साधू फेरफटका मारून परत येत होता. आमचे मार्गदर्शक गुरु निटुरकर महाराज ह्यांचे त्यांच्याशी तेलगूत बोलणे झाले. त्याने सांगितले की, इतक्या लांब एवढ्या वयस्कर लोकांना नेऊ नका, कारण वाटेत रानटी कुत्री, रानडुक्करे, वाघाचा धुमाकुळ चाललेला आहे. माणसाएवढ्या उंचीची सापांची वारुळे आहेत. अशा अवस्थेत एवढ्या वयस्कर लोकांना काही बाका प्रसंग आल्यास परिस्थिती बिकट होईल. तेव्हा तुम्ही सर्व पुढे जाऊ नका. परंतु मार्गदर्शक गुरू खंबीर असल्याने आम्ही नरसिंह सरस्वतींची प्रार्थना करून पुढील प्रवासास सुरूवात केली. हा तर प्रवास आणखी खडतर होता. एकतर घनदाट जंगल व दुसरे त्या साधूने घातलेली भिती. पण देव तारी त्याला कोण मारी ! पाच तासाच्या पायी प्रवासानंतर आम्ही स्वामींच्या गुहेपाशी आलो. गुहेत अक्कलकोट महाराजांची सुंदर मूर्ती आहे. ध्यान व दर्शनाने मनाला अत्यंत आनंद वाटला. तेथील सहस्त्रधारा पाहिल्यावर सर्वांना आंघोळीचा मोह आवरता आला नाही. परत परतीचा ५ तासांचा प्रवास सुरू झाला. संध्याकाळी नरसिंह सरस्वती महाराजांच्या गुहेपाशी पोहचलो. रात्रभर गुहेतच मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी नरसिंह सरस्वती स्वामींचा निरोप घेऊन परतीचा प्रवास सुरू केला. पुन्हा सात डोंगर पार केले. नावेने श्रीशैल्य पर्वताकडे येताना मधे अक्कम्मा देवीचा डोंगर लागतो. तो डोंगर चढून देवीचे दर्शन घेतले व नावेने श्रीशैल्यापाशी आलो. आनंदाची बातमी म्हणजे रोप-वे चालू होता. आता ६०० पायऱ्या चढाव्या लागणार नव्हत्या. महाराजांनी केलेल्या साक्षात्काराचा पुन्हा प्रत्यय आला.

ह्या आध्यात्मिक सहलीवरून एकच गोष्ट कळते की, माणूस कितीही अपंग असला तरी प्रबळ इच्छाशक्ती, श्रद्धा आणि विश्वास असला की, सद्गुरू भक्ताची इच्छा पूर्ण करतात.

- **सुरेश डोंगरे**, पुणे. फोन : २४४७८५४९

---

### चमत्कार

मेनकाबाईंनी वर्तमानपत्रांतील ती जाहिरात पुन्हा वाचली. 'चमत्कार ! चमत्कार !! आजच मागवा. तुम्ही साऱ्यांना पाहू शकाल. पण तुम्हाला कोणी पाहू शकणार नाही. किंमत रू. १००/- फक्त. पत्ता.... '

मेनकाबाईंनी ताबडतोब पैसे पाठविले. आठ दिवसांनी एक आकर्षक पार्सल त्यांच्या नावे आले. उत्सुकतेने त्यांनी ते पार्सल फोडलं. आत होता एक काळा बुरखा !

**- पी.के.देवधर, पुणे**

## ० अभिनंदनीय

२६ जानेवारी २००८ या भारतीय प्रजासत्ताकाच्या ५८ व्या दिना निमित्त सोलापूर युनिटच्या काही जणांनी आधीच ठरविल्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर पासून १५-१६ किलोमीटर अंतरावरील यमगरवाडी या छोट्याशा गावी भेट दिली. किल्लारीच्या विनाशकारी भूकंपानंतर निराधार झालेल्या, विशेष करून भटक्या विमुक्त आणि ज्यांच्या माथी पिढ्यान्‌पिढ्या ''गुन्हेगारी जमात'' म्हणून शिक्कामोर्तब झाले आहे अशा पारधी समाजातील लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या एका संस्थेमुळे ही 'यमगरवाडी' प्रकाशात आलेली आहे.

स्वातंत्र्याच्या ५८-६० वर्षानंतरही प्रौढ अन् पोक्त झालेल्या लोकशाहीत अजूनही उपेक्षा अन् वंचनाच ज्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे आणि देश प्रगतीची आकाशभरारी घेत असतानाही ज्यांची कायम अधोगतीच चालू आहे; अशा गुन्हेगारी जमातीच्या व भटक्या विमुक्तांच्या बालकांचे सर्वांगीण पालन पोषण करण्याची कल्पना किती उदात्त आणि मानवतेची मूल्ये वृद्धिंगत करणारी आहे हे समजण्यासाठी माणसाचे मन संवदेनशील व करुणेने भरलेले असायला हवे.

''रोजचाच दिवस आमच्या दारात वारंट घेऊन उभा असतो । काळ असा की, जगण्यासाठी घेतलेल्या चार श्वासांचाहि टॅक्स मागतो । सुखांनी कधी हात पाठीवर ठेवून विचारली नाही खुशाली। आम्ही वाहतो रोज खांद्यावरून वेदनांच्या परवाली ।।''

गुन्हेगारी पार्श्वभूमी, असुरक्षितता, पोलिसी अत्याचार, समाजाने केलेली उपेक्षा व वंचना यामुळे जिथे पालकांचाच विकास खुंटला तिथे त्यांच्याच अनाथ बालकांचा वाली कुठला ? यामुळेच यमगरवाडीला माणुसकीचा गहिवर दाटला आणि त्यांच्या विकासाचा ध्यास घेऊन यमगरवाडीने चिमुकल्यांचा छोटासाच संसार थाटला.

त्यांच्या या प्रयत्नांना यश येवो ही सदिच्छा ठेवून स्टेट बँकेच्या पेन्शनर्स असोसिएशनच्या सोलापूर युनिटने त्या संस्थेला मदतीसाठी छोटासाच हात दिला. एक मोठे स्टीलचे कपाट, १०० कंपास बॉक्स, १०० ड्रॉईंग वह्या इत्यादी साहित्य भेट दिले.

ह्यावेळी आपल्यातील काही पेन्शनर मंडळींनी संस्थेच्या कार्याने प्रभावित होऊन रोख रकमांच्या देणग्या दिल्या. उपस्थित बालकांनी अतिशय आनंदाने नृत्य, गायन, नाट्याविष्कार इ. कलागुण सादर केले. दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत या बालकांना प्रोत्साहित करण्यासाठी पुण्यातील अनेक स्वयंसेवक तसेच संघटना या मुलांना आपापल्या घरी नेऊन स्वत:बरोबर दिवाळी सणाचा आनंद मिळावा म्हणून प्रयत्न करतात. संस्थेच्या भरभराटीसाठी व तेथील बालकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदिच्छा देऊन ही भेट कृतार्थ झाल्याचा आनंद घेत आम्ही कार्यकर्ते परत फिरलो. सोलापूर युनिटच्या पुढील उपक्रमास असोसिएशन तर्फे हार्दिक शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

मराठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**अंबाजोगाई दर्शन यात्रा**

दर महिन्यात दुसरा व चौथा शुक्रवार/शनिवार/रविवार
**सोबत.माहुरगड, लोणार सरोवर, औंढानागनाथ,अंबाजोगाई,परळी वैजनाथ**
**सहल खर्च रु.५१५०/-३ ए.सी व दुसरा वर्ग रु.४३५०/-**
गुरुवार रात्री (8.05pm.cst) लातूर एक्सप्रेसने निघणार.

************************************

▶ फक्त **रेणुकामाता दर्शन** माहुरगड
गुरुवार रात्री निघुन शुक्रवारी दर्शन शनिवारी सकाळी परत.
**सहल खर्च रुपये.२७५०/-३ ए.सी व दुसरा वर्ग रु.१८५०/-**

************************************

अंबाजोगाई दर्शन यात्रेच्या यशानंतर
नववर्षी आपल्यासाठी नवीन यात्रा.

**कारवार कोस्टल कर्नाटक**

**सोबत पंचक्षेत्र दर्शन.**
धारेश्वर,गुणवंतेश्वर,शेजेश्वर, मुरडेश्वर,आणि गोकर्ण-महाबळेश्वर
**दि.१४ ते १७ जुलै . सहल खर्च रुपये.४८००/-**
▶ ज्येष्ठ नागरिकांस सहल खर्चात 10% सवलत. ◀
( कोकणरेल्वेने प्रवास ) यामध्ये रेल्व प्रवास, सुमो प्रवास
,चहा,नाष्टा,जेवण आणि हॉटेल वास्तव्य इत्यादी खर्च समाविष्ट आहे
नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क
आयोजक: राजेश रानडे.

अनोळखी जगाची ओळख
**TOURWAYS**
Tel : 92232 73496 , 93240 70687
C-305 Palm Acres , M.Phule Road.Mulund (east) Mumbai 400081
www. ambajogai.com

# पूज्य साने गुरुजींची कर्मभूमी - अमळनेर

खान्देशातील एक महत्त्वाचे गाव म्हणजे अमळनेर. पेशवाईच्या शेवटास अमळनेरवर मालेगावकर राजेबहाद्दर यांची सत्ता होती. शिवाजी महाराजांनी सुरत दोनदा लुटली तेव्हा ते धरणगांव-अमळनेर-बेटावद मार्गे गेल्याचा उल्लेख आढळतो. थोरल्या बाजीरावाच्या फौजाही तापीकाठावरुन या गावातून पुढे सरकल्या. येथे एक किल्लाही होता, त्याचे काही अवशेष आता शिल्लक आहेत. उत्तरेचा दगडी दरवाजा व दोन बुरूज चांगल्या अवस्थेत आहेत. गाव बोरी नदीच्या काठावर आहे.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत अमळनेरचे नाव अग्रभागी होते. लो.टिळकांनी होमरुल-लिगसाठी भारतभर प्रवास केला. नोव्हें.१९१६ मध्ये त्यांनी अमळनेरला भेट दिली व येथे स्वराज्य संघाची स्थापना केली. १९३२ च्या लढ्यातही अमळनेर मागे राहिले नव्हते. १९४२ च्या लढ्यात अमळनेरात गोळीबार झाला होता. अमळनेर तेव्हा अत्यंत संवेदनशील गाव समजले जात असे. २७ ऑगस्टच्या गोळीबारात अमळनेरात ९ जण हुतात्मे झाले. अमळनेरचे विद्यार्थीही स्वातंत्र्य चळवळीत मागे नव्हते त्यामागे प्रेरणा होती पूज्य साने गुरुजी यांची.

या अमळनेरचे नाव उच्चारताच साने गुरुजींची सहज आठवण होते. अमळनेरशी त्यांचे दृढ नाते होते. ''अमळनेरचे साने गुरुजी किंवा साने गुरूजींचे अमळनेर''. ते अमळनेरला येण्याचे एक निमित्त घडले. अमळनेरचे प्रताप शेटजींचे तत्त्वज्ञान मंदिर त्यावेळी कीर्तीच्या शिखरावर आरूढ झाले होते. त्या संस्थेस 'फेलो' पाहिजेत अशी जाहिरात 'केसरी' त त्यांच्या वाचनात आली. तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास आपल्याला करता येईल या हेतूने गुरुजी १९२३ च्या जुलै महिन्यात अमळनेरला आले. येथील रम्य वातावरण तत्त्वज्ञान मंदिराचे भव्य आवार, समृद्ध ग्रंथालय यामुळे ते सुखावले. पण त्यांचे फारसे सूत येथे जमले नाही. १७ जून १९२४ ला प्रताप हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून त्यांनी प्रवेश केला. साधे धुतलेले धोतर, अंगात सदरा, कोट, क्वचित खांद्यावर उपरणे, डोईवर काळी टोपी, पायात वहाणा अशा साध्या वेशात ते रहात. त्यांचा शिक्षक म्हणून प्रवेश हा केवळ एका शिक्षकाचा प्रवेश नव्हता, तर एका युगकर्त्याचा स्वातंत्र चळवळीच्या उंबरठ्यावरील तो प्रवेश होता. एका थोर स्वातंत्र्य सेनानीचा पहिला पवित्र पदस्पर्श होता. अमळनेरला भविष्यात घडणाऱ्या राजकीय व सामाजिक चळवळीची ती नांदीच होती. साने गुरूजी नावाच्या एका सौम्य वाटणाऱ्या पण वादळी व्यक्तिमत्त्वाचा तो प्रवेश होता.

राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था म्हणून प्रताप हायस्कूल त्यावेळी आधीच नावाजलेले होते. राष्ट्रीय वृत्तीचे व बाण्याचे स्वाभिमानी विद्यार्थी घडविणारे शिक्षक या संस्थेत होते. त्यात साने गुरुजींची भर पडली. हिऱ्याला कोंदण मिळाले. एक उत्कृष्ट राष्ट्रीय दागिना महाराष्ट्र सारस्वताच्या गळ्यात विराजमान झाला. आपल्या गोड, मृदू स्वभावाने गुरुजी लवकरच विद्यार्थीप्रिय झाले. मुलांच्याच काय पण साऱ्या अमळनेरच्या गळ्यातले ताईत बनले.

प्रसिद्ध कवी माधव ज्यूलियन हे सुद्धा त्या सुमारास याच संस्थेत होते. येथेच गुरुजींचे वाचन, चिंतन, मनन व लेखन बहरले. १९२४ ते १९४२ पर्यंतचा अमळनेरचा इतिहास म्हणजे साने गुरुजींचा इतिहासच म्हणावा लागेल. अमळनेरचे नाव काढताच गुरुजी भारावून जात. पण खरे तर गुरुजींच्या वास्तव्याने अमळनेरच भारावले होते.

लेखक म्हणून गुरुजींनी अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके, चरित्र इ. विपुल साहित्य निर्मिती अमळनेर येथेच केली. 'पत्री', 'आस्तिक', 'निळा पक्षी', 'राजवाडे यांचे चरित्र', 'सखाराम महाराज यांचे चरित्र', 'गोखले यांचे चरित्र', 'बलसागर भारत होवो' हे गाजलेले गीत इत्यादी. सतत पंचवीस वर्षे राजकीय, सामाजिक चळवळीत राहूनही या थोर साहित्यिकाने एकशे पंचवीसच्यावर पुस्तके लिहिली.

गुरुजींच्या जीवनातील ऐन उमेदीचा व कर्तबगारीचा काळ अमळनेर मध्ये व्यतीत झाला. १७ मे १९३० ला गुरुजींना प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल पहिल्यांदाच अटक झाली ती अमळनेर मध्येच.

भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना ज्या दिवशी लाहोर येथे फाशी देण्यात आली त्यादिवशी गुरुजी अमळनेरलाच होते. या स्वातंत्र्यवीरांना झालेल्या फाशीने ते अत्यंत दु:खी झाले. अमळनेरला त्या दिवशी झालेल्या शोकसभेत त्यांनी अप्रतिम भाषण केले. वाढी चौक, बोरी नदीचे पात्र, दरवाजा समोरची मोकळी जागा, टाऊन हॉलचे पटांगण आदि ठिकाणी गुरुजींच्या सभा नेहमी होत असत. या साऱ्या जागा पवित्र बनल्या आहेत. राजकारणात विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे गुरूजीच होते.

६ एप्रिल १९३८ ला गुरुजींनी ''काँग्रेस'' नावाचे साप्ताहिक सुरू केले होते, परंतु इंग्रज सरकारच्या वाढत्या दडपणामुळे व कायद्याने आणलेल्या दडपणामुळे ते १९४० मध्ये बंद करावे लागले.

त्यावेळी पूर्ण खानदेशचे ''डीएसपी'' (अमळनेर हे गाव पूर्व खान्देश म्हणजे हल्लीचा जळगाव जिल्हा यात आहे) थार्नहिल नावाचे ब्रिटिश अधिकारी होते, माझ्या वडिलांना (प्रा.मो.द.ब्रह्मे) लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, ''अमळनेरइतके राजकीयदृष्ट्या संवेदनक्षम गाव महाराष्ट्रात नसावे. आमचे दृष्टीने अमळनेर शांत म्हणजे पूर्व खान्देश शांत, अमळनेर ताब्यात म्हणजे खान्देश ताब्यात. एका तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्याचे हे मत बोलके आहे.

संत सखाराम महाराज, श्रीमंत प्रताप शेटजी व ज्यांच्यामुळे अमळनेरचे नाव सर्वतोमुखी झाले ते साने गुरूजी ही अमळनेरची प्रमुख दैवते होत.

१९५२ मध्ये ३५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेर येथे १२ ते १४ ऑक्टो. ला मोठ्या दिमाखात आयोजित करण्यात आले होते. श्री.कृ.पां.कुलकर्णी या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. संमेलनात ना.सी.फडके, श्री.म.माटे, आचार्य अत्रे व द.वा.पोतदार या सर्वांची व्याख्याने झाली होती. योगायोगाने माझे वडील प्रा.मो.द.ब्रम्हे हे त्या संमेलनाचे संयुक्त कार्यवाह होते. फडके आणि अत्रे या दोघातील ''कलेसाठी कला की जीवनासाठी कला'' या वादाचा शिखराध्याय याच संमेलनात झाला. नंतर मात्र दोघांनीही या वादाचे जाहीर उच्चारण पुन्हा केले नाही.

१९१६ मध्ये श्रीमंत प्रताप शेटजींनी अमळनेर येथे Indian Institute of Phylosophy (तत्त्वज्ञान मंदिर) या संस्थेची स्थापना केली. ती संस्था आजही कार्यरत आहे, १९९२-९३ पासून संस्था उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी निगडित आहे. तत्त्वज्ञान व विविध विषयांवरील उत्तमोत्तम ग्रंथसंपदा हे या संस्थेचे वैशिष्ट्य आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तत्त्वचिंतकांचे साहित्य येथे उपलब्ध आहे. द्वैत, अद्वैत तत्त्वज्ञान विषयाचे हे एक प्रमुख केंद्र गणले जाते.

भागवत धर्माची परंपरा सांभाळणारे सखाराम महाराज संस्थान हे अमळनेरचे एक भूषण आहे. वैशाख शुद्ध एकादशीस सायंकाळी भव्य रथोत्सव असतो व पौर्णिमेस पालखीची भव्य मिरवणूक निघते. लाखो भाविक या सोहळ्यासाठी अमळनेरला येत असतात. दरवर्षी ज्येष्ठ वद्य प्रतिपदेस संस्थानची पायी पंढरपूर वारी सुरू होते. पारोळा-आडगाव-भडगांव-नगरदेवळा-नागद-बिलखेडे-चिखलठाणा-दौलताबाद-पैठण-पाथर्डी-करमाळा मार्गे पंढरपूर वारी होते.

खान्देशात अमळनेरला ''खान्देशचे पंढरपूर'' म्हणूनही संबोधण्यात येते.

मी गेल्या पंधरा-वीस वर्षात 'अमळनेर' विषयी अनेक लेख प्रसिद्ध केले. त्यांचा सारांशरूपाने परिचय वाचकांना व्हावा या हेतूने व अमळनेरच्या प्रेमापोटी हा लेख मी लिहिला आहे.

**- केदार ब्रह्मे**

'कुसुमकुंज' टाऊन हॉल जवळ, अमळनेर, जि.जळगाव

## आगळं नातं !

पुणे-लातूर एस टी मध्ये दोन प्रवाशात गप्पा सुरू झाल्या.

एकाने विचारले - काय हो, हा मांडीवर बसलेला मुलगा तुमचा का? गोड आहे अगदी !

दुसरा म्हणाला - नाही. हा माझा लांबचा सख्खा भाऊ आहे.

पहिला - सख्खा आणि लांबचा ? म्हणजे ?

दुसरा - हो. म्हणजे याच्या आणि माझ्यामध्ये अकरा भावंडं आहेत!

**- पी.के.देवधर, पुणे**

## O सरत्या संध्याकाळी

सरत्या संध्याकाळी आयुष्याच्या
जीवनाचा पीळ सुटत चाललाय
आपुलकी, जिव्हाळ्याचा नाजुक धागा
जाणते अजाणतेपणाची सुटत चाललाय
जबाबदाऱ्याचं ओझं वाहताना
तुझी साथ जाणवलीच नाही
रक्ताची नाती सांभाळताना
तुझं माझं नातं जाणवलंच नाही
नाती गोती मने जपताना
घुसमट तुझी कळलीच नाही
आपुलकीची झळ सोसताना
तुझ्या मनाचा दाह कळलाच नाही
सोडून एकटं रित्या घरात
पाखरं आभाळी उडून गेलीत
प्रेमाची छाया आपला आधार
नजरेआड करून दूर गेलीत
चार भिंतींच्या मोकळ्या घरात
आपण दोघंच मागं राहिलोय
एकमेकाला साथ नित्य देत
पैलतीर मावळतीचा पहात राहिलोय

**- आर.जी.कडवेकर, शाहुपुरी, सातारा**

## O ऋतुचक्र

तू जेव्हा जेव्हा मला सोडून
माहेरी वा परगावी जातेस तो काळ
माझेकरिता असतो ऊन्हाळा........

तू जेव्हा जेव्हा परत येऊन
तुझ्या प्रेमवर्षावाने
मला न्हाऊ घालतेस
तो काळ माझेकरिता असतो पावसाळा...

अन् तू जेव्हा जेव्हा
मार्केट, मॉल, बिग बाजारमध्ये
भटकत खरेदी करतेस,
तेव्हा मला हूडहूडी भरते
तो काळ माझेकरिता असतो हिवाळा..

**- वसंत धुपकर**, पुणे.

## ○इजिप्तच्या इतिहासातील सौंदर्यस्थळे

इजिप्त देशांतील कैरो या शहरात एक उत्कृष्ट वस्तुसंग्रहालय आहे. इ.स.पू. ५५०० पासून इ.स.पू. ६०० पर्यंतच्या काळातील इजिप्तच्या जागतिक गुणवत्तेच्या वस्तु आदर्श स्वरुपात संग्रहित आणि दर्शनीय केलेल्या पहावयास मिळतात. प्राचीन काळात प्रसिद्ध असलेल्या फॅरोजचे अनेक पुतळे इथे कालानुसार ठेवलेले आहेत. इजिप्तच्या इतिहासाच्या महत्त्वाच्या कालखंडाकडे म्हणजे इ.स. पू. ४००० च्या सुमारास तिथे, नाईल नदीच्या सुपीक खोऱ्यात ''रेड किंगडम'' ही पुढारलेली संस्कृती अस्तित्वात होती. त्याकाळी तेथील लोकांना ३६५ दिवसांचे वर्ष, पृथ्वी सूर्याभोवती फिरते, विविध ताऱ्यांची माहिती अशा खगोशास्त्रातील कल्पना ज्ञात होत्या. इजिप्तमध्ये आजही अस्तित्वात असलेले राक्षसी पिरॅमिडस्, त्या कालातील फॅरोजच्या कबरी, कर्णाक, अबुसिम्बल, कॉमआम्बो या ठिकाणी आढळणारी भव्य आणि उत्कृष्ट मंदिरे, त्यांच्या स्थापत्यशास्त्रातील कलेची साक्ष देतात. वैद्यकशास्त्रातही त्यांची प्रगती लक्षणीय होती. कॉमआंबो येथील मंदिरातील भित्तीचित्रांमध्ये त्यावेळी वापरण्यात येणारी व शस्त्रक्रियेत उपयोगी पडणारी आयुधे चित्रांकित केलेली आहेत. त्यामधील बरीच उपकरणे सध्याच्या काळातही उपयोगी पडणारी आहेत. पिरॅमिडस्मध्ये सापडलेल्या ममीज्च्या अंगावर सापडलेले उत्कृष्ट प्रकारची घडणावळ असलेले आणि तेजाने झळाळणारे दागदागिने त्या संस्कृतीच्या सुबत्तेची साक्ष देतात. एवढेच नव्हे तर ''पॉपरस'' या बांबूसदृश असणाऱ्या वनस्पतीपासून बनविलेल्या कागदावर सांकेतिक लिपीमध्ये शास्त्र, कला, करमणूक या विषयांवर मौलिक लेखन केलेले आढळते. ह्या अशा ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या इजिप्तची ही संक्षिप्त ओळख.

अलेक्झांड्रिया हे इजिप्तचे महत्त्वाचे असे शहर आणि उत्कृष्ट बंदर. विशालतम समुद्रकिनाऱ्यामुळे शहराला आगळे सौंदर्य लाभलेले आहे. भूमध्यसागरी आल्हाददायक हवेमुळे या सुंदर शहराच्या प्रथमदर्शनी प्रेमात पडावेसे वाटते. बाराही महिने ऊबदार आणि सुखद वातावरण तसेच रसरशित फळे, भाजीपाला, फुले यामुळे येथे वास्तव्य करणे सुखदायी ठरते. मुंबईच्या मरिनड्राईव्ह सारखा सुंदर रस्ता अलेक्झांड्रियाचे सौंदर्य खुलवितो. नैसर्गिक 'लगून' या सौंदर्यावर मुकुटच चढविते. इजिप्तचा शेवटचा राजा फारुख याचा सुंदर राजवाडा अशा लगूनच्या लगतच बांधलेला आहे. 'अलेक्झांडर द ग्रेट' या महत्त्वाकांक्षी आणि शूर अशा बादशहाने येथे जगातील प्रथम क्रमांकाची लायब्ररी स्थापन करून अभ्यासाला चालना दिली परंतु इ.स. ६४१ मध्ये अरब लोकांनी केलेल्या स्वारीत या महत्त्वपूर्ण लायब्ररीचा नाश केला. सध्याची लायब्ररीची इमारत ही सात मजली असून युनेस्कोच्या मदतीने बांधली आहे. तीन हजार प्रेक्षक एकावेळी बसून अभ्यास करू शकतील एवढी भव्यता आणि ऐंशी लाखाहून जास्त ग्रंथ संग्रही आहेत. इमारत स्थापत्यशास्त्रदृष्ट्या अभ्यासनीय आहे.

कैरो हे इजिप्तचे राजधानीचे शहर. आम्ही उतरलो ते झोसेर हॉटेल, पंचतारांकित आणि उत्कृष्ट दर्जाचे होते. राजधानीचे शहर असल्याने प्रशस्त चौक, मोठे रस्ते, बागा यांनी सजविलेले आहे. विविध देशांच्या राजदूतांची कार्यालये येथे आहेत.

येथील म्युझियम अत्यंत महत्त्वाचे आहे. इजिप्तचा पुरातन इतिहासच जणू वस्तुरुपाने येथे पहावयास मिळतो. म्युझियमच्या तीन नंबरच्या दालनात पिरॅमिडस् आणि कबरीतून मिळवलेले आणि त्या काळी वापरात असणारे सोन्याचे अलंकार पाहून प्रेक्षक आश्चर्यचकित होतात. सोन्याचे सिंहासन, सोन्याचे रथ, शवपेट्यावरून आच्छादलेला सुंदर कलाबत केलेला सोन्याचा पत्रा, सोन्याचे धनुष्य, ममीवर आच्छादलेले सोन्याचे सुंदर काम असलेले मुखवटे (Mask) एवढेच काय पण तुतेनखामेन या एकोणीसाव्या वर्षी, इ.स.पू. १३२४ मध्ये मरण पावलेल्या राजाच्या कबरीतून मिळालेल्या तीन हजार वस्तू ज्यात अप्रतिम मुखवटा आणि सोन्याचे पाणी दिलेला लंगोट आणि दैनंदिन वापरातल्या अनेक वस्तूंचा समावेश आहे. लुटली न गेलेली अशी तुतेनखामेन याची एकमेव कबर यात एवढी संपत्ती तर लुटल्या गेलेल्या कबरी आणि पिरॅमिडस्मध्ये किती संपत्ती असेल याचा विचारच न केलेला बरा !

याच म्युझियममध्ये ''ममीज रूम'' आहे. प्रवेश फी प्रत्येकी शंभर इजिप्शीयन पौंड म्हणजे आठशे रुपये. अतिप्राचीन काळचे, पाच ते सहा हजार वर्षापूर्वीचे सुप्रसिद्ध राजे-महाराजे, फैरोज त्यांच्या राण्या या दालनात काचेच्या पेट्यातून दीर्घतम सुखनिद्रा घेत पडून राहिलेल्या पहावयास मिळतात. एकूण चाळीस ते पन्नास ममीज असाव्यात. सगळ्या ममीजचे दात अजून शाबूत आहेत.

पांढऱ्या शुभ्र वस्त्रात गुंडाळलेल्या या पाच हजार वर्षांपूर्वीच्या शरीराची आता पावडर होते की काय असे वाटत होते. वाटले होते की या ममीज रात्री माझ्या स्वप्नात भुतांच्या रुपात येतील. परंतु तसे काही घडले नाही. ममी फिकेशनची प्रक्रिया करताना मृत शरीरातून मेंदू, यकृत, किडनी, आतडी वगैरे अवयव काढून शरीराचे निर्जलीकरण करायचे. फक्त हृदय शरीरात परत ठेवायचे. भावनांचे केंद्र हे मेंदूत नसून हृदयात आहे. अशी समजूत त्यावेळी झाली असावी.

कैरोपासून जवळच गिझा GIZA येथे पिरॅमिडचे दर्शन घडते. एका पिरॅमिडमध्ये उत्सुकता आणि जिज्ञासेपोटी पंचवीस पौंड प्रत्येकी मोजून, आतल्या चिंचोळ्या भागात प्रत्यक्ष ममी ठेवतात ती जागा पाहून आलो. ओणवे होऊन चालत अर्धा कि.मी. जावे लागते. हवा विरळ असल्याने, जिवाची तगमग होऊन केव्हा

येथून बाहेर पडतो असे वाटते.

मधल्या भागात ममी आणि त्यांच्या सुखद परलोक यात्रेसाठी आवश्यक त्या वस्तूंचा साठा करून ठेवतात. तेथपर्यंतच जाता येते. बाकीचा भाग प्रचंड आकाराच्या दगडांनी व्यापलेला आहे. हे दगड प्रत्येकी दोन ते तीन टन वजनाचे आहेत. यापैकी मोठा पिरॅमिड Great Pyramid हा चारशेसाठ फूट उंचीचा आणि त्याचा पायथा तेरा एकर जमिनीवर विस्तारलेला आहे. अशाच प्रकारचे परंतु लहान आकाराचे पिरॅमिडस् तिथे आहेत. तेथून जवळच 'स्फेंक्स' हा एकाच दगडातून कोरलेला मानवी चेहरा आणि सिंहाचे शरीर असलेला प्रचंड पुतळा तरीही प्रमाणबद्ध आहे. सिंहाची बैठक प्रेक्षणीय आहे. कबुतरे इतर पक्षी यांनी या पुतळ्याचे डोळे, कान, नाक मोठ्या प्रमाणावर खराब केलेले आहे.

कैरोहून लक्झर (LUXUR) या गावी येताना फर्स्टक्लास इजिप्शियन ट्रेनने 'ओव्हरनाईट' प्रवास केला. छोट्याशा केबीनमध्ये जास्तीत जास्त सुविधा दिलेल्या आहेत.

लक्झर शहराजवळ 'व्हॅली ऑफ किंग्ज्' आणि 'व्हॅली' ऑफ क्वीन्स्' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उंच, एकाकी डोंगराच्या दरीत त्रेसष्ट कबरी सापडल्या. यातच प्रसिद्ध अशी तुतेनखामेनची कबर आहे. 'रॅमसेसे द सिक्स्थ' याची कबर पहाण्यासारखी आहे. कबरीमध्ये भिंतीवर आणि छतावरही सुदंर चित्रे काढलेली आहेत. पाच हजार वर्षापूर्वीचे हे रंगकाम असेल यावर विश्वास बसणार नाही इतके हे रंग उठावदार आहेत. गुहेतील छत निळ्या रंगात तर आकाशातील चांदण्या सोनेरी रंगात दाखविलेल्या आहेत.

याशिवाय इजिप्तच्या सौंदर्यात भर टाकायला कारण असलेले कर्णाकची मंदिरे पहाण्यासारखी आहेत. जगातील सर्वात मोठा अन् अतिभव्य असा पन्नास हजार चौ.फुटांचा मंडप आहे. कालौघात छप्पर कोसळून गेले. परंतु उत्कृष्ट रंगसंगती केलेले पॅपिरस आणि केळीच्या झाडासारखे प्रशस्त खांब आजही प्रेक्षणीय आहेत. एडफू आणि कॉमआंबो येथील मंदिरामध्ये चित्रमालारुप रंगकाम आहे.

'एस्ना' या ठिकाणी नाईल नदी आणि आस्वान धरण याकडे जाणाऱ्या क्रुझसाठी विज्ञानाचा चमत्कार पहावयास मिळतो. आस्वान या जगातील प्रथम क्रमांकाच्या धरणाकडे जाताना तीनशे कि.मी. लांबीचे सहारा वाळवंट तुडवीत जावे लागते. धरणाच्या पाण्यातून वाचविलेले आणि होते तसेच परत उभारलेले अबुसिम्बलची दोन मंदिरे पहाण्यासारखी आहेत. आस्वान धरणामुळे शेतीला पाणीपुरवठा, पूरनियंत्रण, कमी खर्चाची जलवहातूक, विद्युतनिर्मिती, कसदार शेती आणि पर्यटकांसाठी आकर्षण या गोष्टी इजिप्तला मिळाल्या.

इजिप्तमधील इतिहासाच्या आकर्षणाशिवाय, क्रूझवरील वास्तव्य आणि प्रवास हेही आकर्षण आहेच. प्रशस्त सुंदर डेकवरील पोहण्याचा तलाव आणि नदीच्या भव्य आणि संथ पाण्याकडे पहात तासन्तास वेळ कसा जातो याचा पत्ता लागत नाही. क्रूझवर डिस्को डान्स, बेले डान्स, सिनेमा असे करमणुकीचे कार्यक्रम मन रुजवितात.

प्राचीन सौंदर्यस्थळांना आधुनिक सुखोपभोग आणि आकर्षणे यांची जोड देऊन जागतिक पर्यटकांना आकर्षित करण्याचे त्यांचे प्रयत्न इजिप्तच्या विकासाला पूरक आहेत.

ऐतिहासिक अवशेष पहाण्याची आवड आणि ऐतिहासिक वातावरणात हरवून जाण्याची तयारी असेल तर इजिप्तची सफर ही एक चांगलीच पर्वणी आहे.

**- अशोक वाकचौरे,पुणे**

फोन नं.: २४२१००९४

# आई



नयने मिटता देवापुढती,
तुझी मूर्त ठाकते,
सांजवात पाहता आई गं,
तुझी आठवण येते ॥धृ ॥
निरांजनापरि अखंड तेवून,
फुलवलेस तू माझे जीवन.
सर्वस्व अर्पुनि कर्पूरापरी,
स्मृतिछाया तव उरते ॥१॥

तुझा स्पर्श, तुझी दयार्द्र दृष्टी,
तुझा भरोसा, जरी मी कष्टी
माया ममता तुझी सांगण्या
ज्योत समईची फडफडते ॥२॥

आज लेकीचे लग्न लागता
आठवते मज तुझी आर्तता.
निरोप देता निज दुहितेला
हृदय कसे हुरहुरते ॥३॥

विविधरंगी या नवीन गेही
पोरकाच मी तुझ्याअभावी.
तव मायेची थाप झेलण्या,
तनु ही थरथरते ॥४॥

तृप्त जरी मी निज संसारी,
उणीव भासते तुझी अंतरी
नाही दैवत तुजसम कोणी,
आज मनोमनी मज गमते ॥५॥

**- गोविंद करमरकर, सांगली**

## O वाढदिवस

वाढदिवस माझे चिरंजीव झाले ॥धृ॥
दिवस आले, झरझर गेले वर्षे, महिने, निघून गेले ।
कालचक्राचे भ्रमण अखंड झाले
परंतु वाढदिवस साजरा करायचे
राहूनच गेले ॥१॥
उन्हाळे, पावसाळे, हिवाळे गेले
नक्षत्रे सत्ताविस, अनेकदा आले ।
ऋतू सहा, येता जाता भेटले
परंतु वाढदिवस साजरा करायचे
राहूनच गेले ॥२॥
वयाची साठी सेवेत संपली
सेवानिवृत्तीने सवड थोडी लाभली ।
एकसष्टीच्या वाढदिवसाचे बिगुल वाजले
''पेन्शनर्स असोसिएशनचे'' अभिनंदन पत्र
न विसरता आले ॥३॥
वाढदिवस साजरा करायचे निश्चित ठरले
मेणबत्त्या पेटवून विझविणे, नाही मला पटले ।
औचित्य केक कापण्याचे नाही मना भावले
वाढदिवसाचे स्वागत मी
नावीन्यपूर्ण केले ॥४॥
वाढदिवसाचा सन्मान मी आम्रवृक्ष लावून केला
थोडं पाणी देऊन त्याला स्वावलंबी केला ।
नित्यनेमे तो, फुलणार फळणार आहे
फळातलं अमृत, वाढदिवशी वाटणार आहे
माधुर्य वाढदिवसाचे शतपट वाढले ॥५॥

- **पी.बी.भेंडे,** गांधीनगर, पुसद

## पतिनिष्ठेचे रहस्य !

जोशी आजोबा व आजी एका हॉटेलात जेवायला जातात. जेवणाच्या एका ताटाचीच ऑर्डर देतात. जोशी आजोबा आधी जेवतात. त्यांचे जेवण झाल्यावर दुसऱ्या ताटाची ऑर्डर दिली जाते. वेटर ताट घेऊन येतो व जोशी आजींच्या पुढे ठेवून म्हणतो 'बाई वा ! काय पतिनिष्ठा आहे ! पतीचे जेवण झाल्यावर तुम्ही जेवताय.'

शेजारच्या टेबलाशी बसलेले गृहस्थ हळूच वेटरला म्हणाले, 'अरे, कसली पतिनिष्ठा ? त्यांच्याजवळ एकच कवळी आहे ना, म्हणून त्यांनी असे जेवण केले.

- पी.के.देवधर, पुणे

## ती



पाऊस संततधार,
तिचे एवढेसे घर, गळणारे छप्पर
ती ओली, ओलं पातळ पिळून पिळून
अंगावरच सुकवणारी, सतत कामे करणारी
रात्रभर घरात साठलेले पाणी,
बादल्यात, पातेल्यात भरणारी
अशी माझी कामवाली बाई........
तिचे राबणारे हात, दु:ख मनात, पण हास्य ओठात.......



ताठ मानेने जगणारी, लाचार न होणारी
कामाला वाघ असणारी.......
'तुमा फ्लॅटमधल्या लोकास्नी,
न्हाय कलनार आमचं दु:ख'
असे न म्हणणारी........
तिच्या डोळ्यात मला तिची मुग्धता दिसली
तिच्या हास्यात मला तिची वेदना उमगली.......
माझी शब्दांची फुंकर........
किती सोसते ती सारे, संकटांचे आले जरी वारे........

- **मंगला पुणतांबेकर,** पुणे

## O आपली बँक

आयुष्याच्या ह्या बँकेत
खाती उघडावी प्रेमाची
करावी गुंतवणूक हृदयाची
ठेवावी बचत स्नेहांची ।
घेऊन भागभांडवल माणूसकीचे
व्हावे धारक गोतावळ्याचे
बाळगूनी पासबुक नियतीचे
द्यावे क्रेडिटकार्ड सचोटीचे ।
सद्गुणांचे भांडवल वाढवूनी
व्याजापोटी नाव मिळवावे
सुखाने जगात जगूनी
दु:ख मुदत ठेवीत गोठवावे ।
राग, मत्सर, द्वेषाच्या ठेवी
मनात कधी ठेवू नका
दुर्गुणांचे कर्ज काढूनी
अब्रूचे धिंडवडे काढू नका ।

- **शामराव खंडू पोटे, अंधेरी (पूर्व)**

Regd. under RNI No. MAHBIL04149/13/1/2003-TC & Declaration No. PHM/SR/12/VIII/2004
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008 Dated 22.02.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

**Form IV (See Rule 8)**
**Statement about the ownership and other particulars concerning**
**SBI Pen.Assn.'s "SAMVAD"**

1. Place of Publication : Pune.
2. Periodicity of Publication : Monthly
3. Printer's Name : Shri.Mandar S.Phatak
   Nationality : Indian
   Address : 49/763 Lokmanya Nagar, Navi Peth, Pune 411030.
4. Publisher's Name : Shri.Ramchandra Narayan Lalingkar,
   Nationality : Indian
   Address : "Anubandh", Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030
5. Editor's Name : Shri.Krantisen Ramchandra Athawale
   Nationality : Indian
   Address : "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030
6. Owner's Name : S.B.I.Pensioners' Association (Mumbai Circle), Pune
   Address : "Anubandh",Bldg. No.B/2, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030

I, Shri.Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, SBI Pensioners' Association (Mumbai Circle), Pune hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd/-
R. N. Lalingkar
Date : 25th March 2008 Signature of the publisher

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**प्रकाशक :** श्री. रा. ना. लळिंगकर, सेक्रेटरी, स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे.
**संपादक मंडळ :** सर्वश्री. वसंत धुपकर, प्रभाकर गुपचुप, शरद शिंगवेकर, श्रीधर सहस्रबुद्धे, क्रांतिसेन आठवले
**अंक सजावट, मांडणी व मुद्रित शोधन :** क्रांतिसेन आठवले, प्रभाकर गुपचूप
**मुद्रक :** संविज्ञान इन्फोटेक प्रा. लि., ४९/७६३ लोकमान्य नगर, नवी पेठ, पुणे-३० फोन : २४३३५३०५, २४३३५३२४, ३२५४११५९